# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 20/04/2021

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. 08 :- मिरा भाईंदर शहरातील घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम अन्वये दैनंदिन वॉर्ड साफसफाई करणेकरीता धोरण ठरविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामी सन 2017 मधील MYEP नुसार अंदाजे लोकसंख्या 10.00 लक्ष असून बर्मण कमिटी, लाड समिती, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मार्गदर्शिक निकषानुसार आवश्यक मजुरांची संख्या 2801 होती. तसेच 147 वाहने आवश्यक होते. त्यानुसार मा. महासभेपुढे वॉर्ड साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन करणेकामी निविदा मागविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. महासभा दि. 19/05/2017, ठराव क्र. 12 अन्वये घनकचरा व्यवस्थापन करणेकामी वाहनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून पुनश्च: मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेस ठराव पारीत करण्यात आला होता.

तद्नंतर मा. महासभा दि.08/12/2017, ठराव क्र. 54 अन्वये दिलेल्या अधिकारानुसार मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणेस मंजुरी देण्यात आली होती. दि. 26/03/2018 रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीमध्ये खाजगीकरणामार्फत प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड सफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाबाबत ठराव पारीत करण्यात आला होता.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने अनुक्रमे दि. 18/04/2018 व दि. 19/07/2018 रोजी निविदा मागविण्यात आली होत्या. परंतु, दरम्यान काळात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासन निर्णय क्र. स्वमअ-2018/ प्र.क्र.355(6)/ नवि-34, दि.30/1/2019 मान्यता दिली होती. त्यामुळे सदरची निविदा रद्द करण्यात आली होती.

शासनाने मंजुर केलेल्या DPR नुसार घनकचरा वाहतुक करणेकामी 117 वाहने खरेदी करणेसाठी GeM Portal द्वारे निविदा मागवून सदर निविदा मंजुर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार 117 वाहने खरेदी कामी Letter of Acceptance देण्यात आलेले आहे.

मा. महासभा ठराव क्र. 54, दि. 08/12/2017 च्या अनुषंगाने दि.21/06/2019 रोजीच्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या बैठकीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते, गटारे सफाई करणेसाठी एकुण 1599 कंत्राटी मजुरांसाठी 04 वर्षाकरीता व मनपाच्या वाहनामार्फत कचरा संकलन करणेसाठी प्रत्येक वाहनांवर एक वाहनचालक व 04 कंत्राटी मजुर असे एकुण 117 वाहनांवर पुरवठा करणे व दैंनंदिन देखभाल, दुरुस्ती (Operation Maintenance Schedule नुसार), इंधन व निगा या कामासाठी 08 वर्षाकरीता निविदा मागविण्याची कार्यवाही करणेस मंजुरी दिली होती.

त्यानुसार महानगरपालिकेने शहरातील रस्ते, गटार सफाई करणेकरीता 1599 कंत्राटी मजुर पुरवठा करणे व घनकचरा व्यवस्थापन करणेकामी महानगरपालिकेच्या 07 टन क्षमतेचे 33 वाहने, 03 टन क्षमतेचे 84 वाहनांवर दैनंदिन देखभाल, दुरुस्ती (Operation Maintenance Schedule नुसार), इंधन व निगा या कामाची दि.26/06/2019 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामी वेळोवेळी अनुक्रमे दि. 21/08/2019, दि.07/02/2020, दि. 30/05/2020 रोजी निविदा व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि. 30/05/2020 रोजी निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने मा. आयुक्त यांनी सदर निविदा रद्द केली आहे.

शासनाने घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजुर केल्याने महानगरपालिकेने निविदेबाबत असलेले धोरण बदल करावे लागले. तसेच राज्य शासनाने निविदेस काही कालावधी करीता दिलेली स्थगिती, मा. उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती, निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने तसेच Covid-19 प्रादुर्भाव झाल्याने निविदा अंतिम होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिका क्षेत्रात सन 2017 ते सन 2021 या 04 वर्षाच्या कालावधीत शहरातील लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेची अंदाजे 12.00 लक्ष लोकसंख्या आहे. सदर लोकसंख्याच्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्यात वाढ झाली आहे. तसेच मोकळ्या जमिनीवर विकासकर्त्याने मोठ्याप्रमाणात नागरी वस्ती, गृहनिर्माण संस्था, कॉम्प्लेक्स बांधण्यात आले असून यामध्ये नव्याने रस्ते, गटारे बांधण्यात आले आहेत. तसेच नव्याने झालेल्या वसाहतींमध्ये मोठ्याप्रमाणावर घनकचरा निर्माण होत आहे.

मा. महासभा ठराव क्र. 54, दि. 08/12/2017 च्या अनुषंगाने दि.21/06/2019 रोजीच्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या निर्णयानुसार DPR प्रमाणे मंजुर वाहने GeM Portal द्वारे खरेदी करणेसाठी निविदा प्रक्रिया करून वाहने खरेदीसाठी Letter of Acceptance देण्यात आलेले आहे. तसेच साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी निविदा प्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दि. 21/06/2019 रोजीच्या गठीत समितीच्या निर्णयात दैनंदिन रस्ते, गटार सफाई कामी 1599 मजुर व घनकचरा वाहतुकी कामी मनपा.चे 117 वाहनाचे Operation Maintenance करीता निविदा मागविणेस मंजुरी आहे. "स्वच्छ भारत अभियान" यांच्या मार्गदर्शिक निकषानुसार, बर्मण कमिटी व लाड समिती यांच्या शिफारशीनुसार सद्यस्थितीत अंदाजे 5000 कंत्राटी मजुर दैनंदिन रस्ते, गटार सफाई कामी आवश्यक आहे. तथापि, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता दि.21/06/2019 रोजीच्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या निर्णयामध्ये अंशत: बदल करून मनपा. क्षेत्रातील दैनंदिन रस्ते, गटारे सफाई करणेसाठी 1599 ऐवजी 2384 कंत्राटी मजुर पुरवठा करणे व 117 वाहन संख्येत वाढ करून अतिरिक्त 03 टन क्षमतेचे 13 वाहने खरेदी करून दैनंदिन साफसफाई व Operation Maintenance करीता निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

गोषवारा प्राप्त दि. 9/8/2021 वेळ दु. 3.41
मा. ~~स्थायी समिती~~ / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 3 वर्ष :- 2021/22

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

लिपिक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\New Goshwara Ward 16-04-2021.docx